(१) या नियमांखाली खालील शब्दांचीही व्याख्या स्पष्ट करण्यात आली आहे. ज्या शब्दांबाबत साशंकता असेल त्या शब्दांचे स्पष्टीकरण हे केंद्रीय निवडणूक आयोग, भारत सरकार यांच्या निवडणूक कायद्यानुसार असणा-या स्पष्टीकरणाचे विश्लेषण असे गृहीत धरणेत येईल.

(२) निवडणूकीच्या संपूर्ण कार्यकालातील एखाद्या वादास/तक्रारीस सांगली शिक्षण संस्थेच्या पुढे दिलेल्या निवडणूक नियमांमधून स्पष्टीकरण अथवा मार्गदर्शन मिळत नसेल अशा वेळी केंद्रीय निवडणूक आयोग भारत सरकार यांच्या त्यावेळच्या कायद्यानुसार निर्वाचन अधिकारी निर्णय करतील.

(३) निवडणुकी संबंधीचे सर्व वाद व तक्रारी फक्त सांगली येथील न्यायालय/संबंधित अधिका-यांच्या अधिकार कक्षेस पात्र राहतील. (Subject to juricdiction of Sangli Court)

(४) **मतदार**

१) सांगली शिक्षण संस्थेच्या घटनेतील तरतुदीनुसार आश्रयदाते सदस्य, विशेष सदस्य, सामान्य सदस्य, पेढया, हिंदू एकत्र कुटुंब, संस्था, संघटित घटक यांचे संस्थेने मान्यता दिलेले प्रतिनिधी हेच संस्थेच्या संचालक मंडळावरील ' अ ' वर्गीय सदस्य निवडणारे मतदार असतील.

२) स्थानिक स्वराज्य संस्था वगळता इतर सर्व पेढया, हिंदू एकत्र कुटुंब, संस्था, संघटित घटक यांना त्यांच्या प्रतिनिधी नियुक्तीच्या लेखी पत्रासोबत
निवडणूक वर्षातील दिनांक ३१ मार्च रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाच्या अंतिम हिशेबपत्रकाची सत्यप्रत. मूळ रजिस्ट्रेशन सर्टिफिकेटची सत्यप्रत, आणि कंपनी संस्थेची सभासद असल्यास रजिस्ट्रार ऑफ कंपनीज् यांचेकडील नोंदणी कायम असल्याचा पुरावा. यापैकी कोणताही एक पुरावा दाखल करावा लागेल.

३) वर कलम दोन मध्ये नमूद केल्यानुसार प्रतिनिधी नियुक्तीच्या पत्रासोबत आवश्यक कागदपत्रे पुरावा म्हणून दाखल न केल्यास संबंधित पेढी, हिंदू एकत्र कुटुंब, संस्था, संघटित घटक यांचे प्रतिनिधीस मतदार म्हणून निर्वाचन अधिकारी मान्यता देणार नाहीत.

(५) **मतदारांची यादी**

प्रत्येक निवडणुकीच्या वेळी घटनेतील तरतुदीनुसार तयार करण्यात आलेल्या पात्र मतदारांची यादी.

**अ)** संस्थेने ठेवलेल्या सदस्य नोंदणी पुस्तकात सदस्यांचे जसे नांव लिहिलेले असेल तसेच नांव मतदार यादीत असेल.

**ब)** निवडणूक वर्षाच्या १५ जून या तारखेस कच्ची मतदार यादी तयार होईल.

**क)** कच्ची मतदार यादी तयार होण्यापूर्वी किमान तीस दिवस अगोदर ज्यांचे नांव संचालक मंडळाने सदस्य म्हणून मान्य केलेले असेल अशाच व्यक्तींच्या नावाचा समावेश मतदार यादीत होईल.

**ड)** कच्ची मतदार यादी तयार झाल्यावर ती अवलोकनार्थ कार्यालयात कार्यालयाचे वेळात ठेवण्यात येईल व संस्थेच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल.

**इ)** वरील प्रमाणे तयार झालेल्या मतदार यादीत दुरुस्ती सुचविण्यासाठी सदर यादीच्या प्रसिध्दी पासून पंधरा दिवसाच्या आत तसा पत्रव्यवहार संबंधितांनी निर्वाचन अधिकारी यांचेकडे केला पाहिजे.

**फ)** वरील इ) मधील तरतुदीस अनुसरुन दुरुस्तीबद्दल आलेल्या प्रस्तावापैकी मान्य झालेल्या प्रस्तावास धरुन दुरुस्त केलेली यादी ही पक्की यादी समजण्यात येईल. या पक्क्या यादीतील सदस्यांचा पत्ता हाच निवडणुकीचे संदर्भातील सर्व बाबतीत ग्राहय मानला जाईल.

**ग)** अशी जी दुरुस्त केलेली पक्की यादी तयार होईल ती निवडणूक वर्षाच्या १५ जुलै या तारखेस प्रसिध्द केली जाईल व ती कोणाही मतदारास पहावयास संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध राहील आणि संस्थेच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल.

**(६) उमेदवार**

१) ' अ ' वर्गीय सदस्यांच्या निवडणुकीसाठी तयार केलेल्या मतदार यादीतील (घटनेनुसार अपात्र ठरविलेले मतदार सोडून) मतदारच ''अ '' वर्गीय सदस्यांच्या निवडणूकीसाठी उमेदवारीचा अर्ज भरण्यास पात्र रहातील. मात्र सदस्य झाल्याच्या दिनांकापासून दोन वर्षे पूर्ण झाल्याशिवाय त्यांना संचालक मंडळाच्या ' अ ' वर्गीय सदस्यांच्या निवडणुकीस उभे रहाता येणार नाही.

२) संस्थेच्या सेवेतून निवृत्त झालेल्या सदस्यांना ते निवृत्त झाल्याच्या तारखेनंतर सहा वर्षे ' अ ' वर्गीय सदस्यांच्या निवडणूकीस उभे रहाता येणार नाही.

३) संस्थेच्या सेवेत असणा-या सदस्यांना अ वर्गीय संचालक मंडळाच्या निवडणूकीस उभे रहाता येणार नाही.

**(७) मतदारांना सूचना**

निवडणुकीचा संपूर्ण कार्यक्रम मतदारांना निवडणूक वर्षाच्या जून महिन्याच्या एक तारखेस साध्या पोस्टामार्फत, ईमेलने निर्वाचन अधिकारी कळवतील व संस्थेच्या कार्यालयात आणि संस्थेच्या वेबसाईटवर प्रसिध्द करतील. त्यात खालील गोष्टींचा व तत्कालीन आवश्यकतेनुसार अन्य महत्वाच्या बाबींचा समावेश असेल.

१) मतदाराचे नांव व त्याच्या मतदान केंद्राचा पत्ता.

२) कच्ची मतदार यादी प्रसिध्द करणेची तारीख.

३) मतदान केंद्राच्या ५० किलोमीटर (पन्नास किलोमीटर) बाहेरील सभासद मतदारास मतदान केंद्रावर येऊन मतदान करणे शक्य नसेल तर निवडणूक नियम १२ मधील तरतूदीनुसार पोस्टाने मतदान करणेची विनंती रजिस्टर ए.डी.पोस्टाने निर्वाचन अधिकारी यांचेकडे करणेची अंतिम तारीख.

४) कच्च्या मतदार यादीतील दुरुस्तीसाठीच्या पत्रव्यवहाराची अंतिम तारीख.

५) पक्की मतदार यादी प्रसिध्द करणेची तारीख.

६) उमेदवारी अर्ज मिळण्याचा कालावधी.

७) उमेदवारी अर्ज भरणेचा कालावधी.

८) उमेदवारी अर्ज छाननी उमेदवार प्रतिनिधी नांव कळविणे अखेरची तारीख.

९) उमेदवारी अर्जाच्या छाननी/तपासणीची तारीख.

१०) छाननी/तपासणी निर्णया विरुध्द लेखी तक्रार करणेची अंतिम मुदत.

**११)** तक्रारीवरील निर्णयाची तारीख.
**१२)** पात्र उमेदवार यादी प्रसिध्द करणेची तारीख.
**१३)** उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा कालावधी.
**१४)** उमेदवार अंतिम यादी प्रसिध्दीची तारीख.
**१५)** मतदान केंद्र बदलून मिळणेसाठी पत्रव्यवहार करणेची अंतिम तारीख.
**१६)** पोस्टाव्दारे मतदानाची विनंती मंजूर झालेल्या मतदारांना रजि.एडी पोस्टामार्फत मतदानासाठी मतपत्रिका पाठविण्याची तारीख.
**१७)** रजि.एडी पोस्टाने मतपत्रिका संस्थेच्या कार्यालयाकडे पोहोचण्याची अखेरची तारीख व वेळ.
**१८)** मतदानाची तारीख व वेळ.
**१९)** मतमोजणी सुरु करणेचा दिनांक व वेळ. (निर्णय :-मतमोजणी संपलेनंतर निर्वाचनअधिकारी निर्णय जाहीर करतील.)

(८) **उमेदवारीचा अर्ज**

**अ)** उमेदवारीचा अर्ज परिशिष्ट अ मध्ये दिलेल्या नमुन्याप्रमाणे असेल. निर्वाचन अधिकारी यांनी सदर नमुन्याबर हुकुम पुरविलेल्या फॉर्मवरच उमेदवाराने अर्ज केला पाहिजे.

**ब)** उमेदवारीचा फॉर्म सभासदाच्या लेखी मागणी नुसार आवश्यक ते शुल्क भरुन घेऊन सभासदाच्या मागणी प्रमाणे समक्ष अथवा पोस्टाने निर्वाचन अधिका-याकडून पुरविला जाईल. सदर शुल्क संस्था कार्यालयात कार्यालयीन वेळेत रोखीने अगर ' कार्यवाह, सांगली शिक्षण संस्था, सांगली ' या नावे डिमांड ड्राफ्ट (payable at Sangli) ने स्वीकारले जाईल.

**क)** संस्थेच्या कोणाही सभासदास मतदारांची यादी पाहिजे असल्यास आवश्यक ते शुल्क भरुन मिळू शकेल.

**ड)** उमेदवार स्वतःचा सूचक व अनुमोदक असू शकणार नाही. तसेच एकच व्यक्ती सूचक व अनुमोदक असू शकणार नाही. एका व्यक्तीस निवडून यावयाच्या उमेदवारांच्या संख्येइतक्या व्यक्तीस सूचक अथवा अनुमोदक होता येईल.

**इ)** घटनेनुसार उमेदवारीस पात्र मतदारच सूचक व अनुमोदक असले पाहिजेत.

**फ)** वरील नियमास आणि घटनेतील उमेदवार विषयक तरतुदीस धरुन जे अर्ज असतील तेच ग्राहय (valid) मानले जातील.

**ग)** उमेदवारीचे अर्जासोबत रुपये २५००/- अनामत ' कार्यवाह, सांगली शिक्षण संस्था, सांगली ' या नांवे डिमांड ड्राफ्टने (payable at Sangli) अथवा रोखीने कार्यालयीन वेळेत संस्था कार्यालयात भरणेची आहे.

**ह)** एकूण ग्राहय मताच्या १/६ पेक्षा कमी मते पडलेल्या उमेदवारांची अनामत रक्कम जप्त होईल.

(९) **निर्वाचन अधिकारी**

**अ)** मतदारांची कच्ची यादी तयार करणेपासून निवडणुकीचा निर्णय जाहीर करण्या पर्यंतच्या निवडणूकीच्या संबंधीच्या सर्व कामांचा निर्णय व कार्यवाही निर्वाचन अधिका-यांनी करणेची आहे.

**ब)** संस्थेच्या दोन कार्यवाहांपैकी एकाची निर्वाचन अधिकारी म्हणून नियुक्ती संचालक मंडळ करील. सदरची नियुक्ती निवडणूक वर्षाच्या मे महिन्यात संचालक मंडळ करील.

**क)** निर्वाचन अधिकारी विद्यमान संचालक मंडळाची मुदत संपण्या अगोदर किमान सात दिवस निवडणुकीचा निकाल जाहीर करता येईल अशा बेताने निवडणुकीचा कार्यक्रम ठरवील. काही अपरिहार्य कारणाने नियुक्त केलेले निर्वाचन अधिकारी या निवडणुकीचे काम पाहू शकत नसतील तर त्या मुदतीपुरते दुसरे कार्यवाह निर्वाचन अधिकारी म्हणून काम पाहतील.

**ड)** निर्वाचन अधिका-याने निवडणुकी बाबतचे दिलेले सर्व निर्णय अंतिम समजले जातील.

**इ)** मतदान केंद्राची निश्चिती निर्वाचन अधिकारी करतील. सदर मतदान केंद्रे ही संस्थेच्या मालकीच्या जागेतीलच असतील.

**फ)** आवश्यकतेनुसार मतदान केंद्र प्रमुख, केंद्राधिकारी, केंद्र सहाय्यक व सेवक यांची नियुक्ती निर्वाचन अधिकारी करतील. सदर कर्मचारी संस्था कार्यालय व संस्थेच्या विविध शाखांमधून घेतले जातील.

**ग)** जरुरीनुसार मतपत्रिका व मतदानसाहित्य तयार करुन घेण्याचा किंवा उपलब्ध करुन घेण्याचा अधिकार निर्वाचन अधिका-यांकडे असेल.

**ह)** मतमोजणीसाठी जरुर ती सर्व व्यवस्था व कार्यवाही निर्वाचन अधिकारी करतील.

**ज)** नियम ७ मध्ये नमूद केलेल्या तारखा या मतदारांना व उमेदवारांना पुरेसा अवधी देण्याचे उद्देशाने कळविणेच्या आहेत. आणीबाणी, दैवी घटना अथवा अन्य पर्याप्त कारणासाठी त्यात बदल करणेचा अधिकार निर्वाचन अधिका-यांना राहील. अशा बदलामुळे निवडणुकीच्या वैधतेवर कोणताही परिणाम होणार नाही. अशा बदलांना शक्य असल्यास वर्तमानपत्रात प्रसिध्दी देणेची आहे. तसेच संस्थेच्या वेबसाईटवरही त्याची प्रसिध्दी करणेची आहे.

(१०) **सर्वसाधारण नियम**

**अ)** उमेदवाराच्या अर्जाची छाननी, मतदान, मतमोजणी या कामाचे वेळी उमेदवार अगर त्यांचे तर्फे प्रत्येकी एक प्रतिनिधी उपस्थित राहू शकेल. तसेच प्रत्येक मतदान केंद्रावर उमेदवारास आपला एक प्रतिनिधी उपस्थित ठेवता येईल. प्रतिनिधीने परिशिष्ट ब मध्ये दिलेल्या ठरावीक नमुन्यात अधिकारपत्र हजर केले पाहिजे. सदर प्रतिनिधी हा मतदार असला पाहिजे.

**ब)** मत मोजणीमध्ये निवड करण्याचे जागेसाठी उभे असलेल्या दोन वा अधिक उमेदवारांना जर समसमान मते पडली तर निर्वाचन अधिकारी मतांची तपासणी व फेर मोजणी करतील व पुन्हा समसमान मते पडल्यास निर्वाचन अधिकारी चिठ्ठया टाकून त्यापैकी कोण निवडून आले याचा निर्णय जाहीर करतील.

**क)** मतदानाची तारीख ही निवडणूकीची तारीख म्हणून ग्राहय असेल.

**ड)** संचालक मंडळाच्या अ वर्गीय सदस्यांची निवड घटनेतील तरतुदीनुसार करणेची आहे.

**इ)** जाहीर झालेल्या उमेदवारांच्या अंतिम यादीतील उमेदवारांची संख्या घटनेतील तरतुदीनुसार निवडणुकीसाठी असलेल्या जागांइतकीच अगर कमी भरत असेल तर ते सर्व उमेदवार निवडून आले आहेत असे घोषित केले जाईल.

(११) **मतपत्रिका**

**अ)** मतपत्रिकेच्या स्थळ प्रतीवर संस्थेचे नांव, निवडणूक तारीख, मतपत्रिका अनुक्रमांक व सभासदाचा मतदार यादीतील क्रमांक आणि मतदार यांना मतपत्रिका मिळालेबाबत स्वाक्षरी साठी जागा असेल.

**ब)** उमेदवारांच्या अंतिम यादीचे आधारे निर्वाचन अधिकारी मतपत्रिका अक्षर विल्हेवारीनुसार तयार करुन घेतील. मतपत्रिकेत प्रथम आडनाव, नाव, वडिलांचे/पतीचे नाव त्यासमोर मत नोंदविणेची जागा असेल. दोन किंवा अधिक उमेदवारांची आडनावे सारखी असतील तर, उमेदवाराचे नांव विचारात घेऊन त्यानुसार क्रम देणेत येईल. मतपत्रिका परिशिष्ट क व ड मध्ये दिलेल्या नमुन्याबरहुकूम राहील.

(१२) **मतदान**

**१)** मतदान गुप्त मतदान असेल. निर्वाचन अधिकारी जरुरीनुसार मतदान केंद्र निश्चित करतील व भौगोलिकतेचा आणि अंतराचा विचार करुन सभासदांची गावे त्या त्या केंद्रात समाविष्ट करतील. निर्वाचन अधिकारी यांनी स्थापित केलेल्या मतदान केंद्राच्या ५० किलोमीटर (पन्नास किलोमीटर) बाहेरील सभासद मतदारास मतदान केंद्रावर येऊन मतदान करणे शक्य नसेल तर, त्या मतदारास निवडणूक वर्षाच्या ३० जून अखेर परिशिष्ट फ मध्ये दिलेल्या नमुन्यात पोस्टाने मतदान करणेसाठीचा विनंती अर्ज रजिस्टर एडी पोस्टाने निर्वाचन अधिकारी यांचेकडे करता येईल. निवडणूक वर्षाच्या ३० जून नंतर पोस्टाने मतदानासाठी येणा-या विनंती अर्जांचा विचार होणार नाही. पोस्टाने मतदान करणेसाठी मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करुन निवडणूक वर्षाच्या १५ जुलै अखेर आपला निर्णय निर्वाचन अधिकारी जाहीर करतील व तो संस्थेच्या कार्यालयात आणि संस्थेच्या वेबसाईटवर प्रसिध्द करतील. पोस्टा मार्फत मतदानासाठी निर्वाचन अधिकारी यांनी मंजूरी दिलेल्या मतदार सभासदांनाच मतपत्रिका रजिस्टर एडी पोस्टा मार्फत पाठविणेत येईल व मतदार सभासदांनी आपले मत नोंदवून तसा मतपत्रिकेचा लखोटा रजिस्टर एडी पोस्टानेच निर्वाचन अधिकारी यांचेकडे पाठविणे आवश्यक राहील.

**२)** निवडणूकीचा निकाल जाहीर करणेच्या वेळेपर्यंत रजिस्टर एडी पोस्टाने येणा-या मतपत्रिका मतमोजणीसाठी ग्राहय धरल्या जातील. निवडणूकीचा निकाल जाहीर झाल्याच्या वेळे नंतर रजिस्टर एडी पोस्टाने प्राप्त होणा-या मतपत्रिका हया अवैध होतील.

**३)** ज्या सभासद मतदारांना आपले मतदान केंद्र बदलून पाहिजे आहे त्या सभासद मतदारांनी मतदानाच्या तारखेपूर्वी दहा दिवस आधी पर्यंत मतदान केंद्र बदलून मिळणेसाठी निर्वाचन अधिकारी यांचेकडे पत्रव्यवहार करणे आवश्यक राहील. मतदानाचे दिवशी कोणाही सभासद मतदारास मतदान केंद्र बदलून मिळणार नाही.

(१३) **गुप्त मतदानाचे नियम**

निर्वाचन अधिकारी जरुरीनुसार मतदान केंद्र निश्चित करतील, तसेच प्रत्येक मतदान केंद्रावर खालील गोष्टी असतील.

**अ)** नक्की केलेले मतदान क्षेत्र, केंद्रात मत देण्याचा हक्क असेल अशा मतदारांची यादी.

**ब)** मतपत्रिकेची प्रत.

**क)** गुप्त मतदानासाठी आवश्यकतेनुसार एक किंवा अधिक मतदान कक्षांची व्यवस्था.

**ड)** पुरेशा मतपेटया, मतपत्रिका, संबंधित क्षेत्रासाठी निश्चित केलेली मतदार सभासद यादी ,

मतपत्रिकेवर खूण करणेसाठी मतदारांना आवश्यक असलेल्या वस्तू, मतदान प्रक्रिया पूर्ण करणेसाठी आवश्यक असलेल्या वस्तू.

मतदान कक्षात कोणत्याही एका वेळी प्रवेश देण्यासाठी मतदारांच्या संख्येचे नियमन मतदान केंद्रप्रमुख करील. केंद्रामध्ये खालील व्यक्तींव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीला प्रवेश देण्यात येणार नाही.

**अ)** मतदान अधिकारी

**ब)** निवडणुकीशी संबंधित असा कामावरील असलेला कर्मचारी वर्ग

**क)** उमेदवार व त्याचे मतदान कक्ष प्रतिनिधी.

**ड)** निर्वाचन अधिकारी.

मतदान कक्षामध्ये गुप्त मतदान पध्दतीने मते देण्यासाठी मतपेटया ठेवल्या जातील. या मतपेटीचे बाबत खालील गोष्टी मुख्य करुन पाहिल्या जातील.

**अ)** मतपेटी सुव्यवस्थित असेल.

**ब)** मतपेटीच्या सुरक्षिततेसाठी एखादी कागदी मोहोर जरुरीनुसार वापरली जाईल.

**क)** मतदान केंद्रप्रमुख या कागदी मोहरांवर आपली स्वाक्षरी करतील आणि उपस्थित असलेल्या उमेदवार अगर त्यांचे प्रतिनिधी, ज्यांची त्यावर स्वाक्षरी करणेची इच्छा असेल त्यांच्या, स्वाक्ष-या घेतील अगर घेतल्या जातील व मोहरा लावतील.

**ड)** मतपेटी ही मतदानापूर्वी कमीतकमी पंधरा मिनीटे अगोदर सील करुन मतदानासाठी तयार ठेवली जाईल. ही कार्यवाही करीत असताना केंद्रप्रमुख मतपेटी मोकळी (रिकामी) असल्याची खात्री करुन देईल.

**इ)** मतपेटीवर केंद्रप्रमुख, मतदान केंद्राचे नांव, पेटी नंबर इत्यादी गोष्टी समजणेचे दृष्टीने योग्य त्या पध्दतीने मतपेटीचे आत व बाहेर दर्शविणारी मोहोर (स्लीप) टाकतील व लावतील.

**फ)** त्यानंतर मतपेटी मतदानास योग्यरित्या बंद करुन, मोहोरबंद आणि सुरक्षित करण्यात येईल आणि ती मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान प्रतिनिधी यांच्या नजरेसमोर राहील अशा जागी ठेवण्यात येईल.

**ग)** मतदानाची वेळ संपलेवर केंद्रप्रमुख योग्य पध्दतीने सील करतील, तसेच मतपेटी बंद केलेवर त्यावर केंद्रप्रमुख आपली स्वतःची सही केलेली मोहर लावतील व इच्छा असल्यास उपस्थित उमेदवार अगर त्यांचे प्रतिनिधी यांना त्यावर सही करणेस अनुमती देतील.

**(१४) केंद्रप्रमुख, केंद्राधिकारी, केंद्र सहाय्यक व सेवक यांची कर्तव्ये :-**

मते सर्वस्वी गुप्तपणे नोंदली जात आहेत, या नियमान्वये ज्या व्यक्तींना मतदान केंद्रात प्रवेश देता येईल केवळ अशाच व्यक्तींना तेथे प्रवेश दिला जात आहे आणि ज्या व्यक्तींनी त्यांची मते दिली आहेत किंवा ज्या व्यक्तीं विरुध्द आक्षेप घेण्यात आला असेल आणि तो मान्य करण्यात आला असेल अशा व्यक्ती ताबडतोब बाहेर निघून जातील. या गोष्टी पाहणे हे अधिका-यांचे व त्यांच्या सहाय्यकांचे कर्तव्य असेल. तसेच, हे नियम व त्या अन्वये निर्वाचन अधिका-याने दिलेले कोणतेही निर्देश यांचे सर्व बाबतीत काटेकोरपणे पालन करण्यात येत आहे, हे पाहणेदेखील त्यांचे कर्तव्य असेल.

**(१५) मतपत्रिका देणे**

**अ)** मतदानाच्या प्रारंभी निश्चित केलेल्या वेळे आधी कोणत्याही मतदारास कोणतीही मतपत्रिका देण्यात येणार नाही.

**ब)** मतदान समाप्तिसाठी ठरलेल्या वेळेनंतर कोणासही मतपत्रिका दिली जाणार नाही. मात्र मतदान संपण्याच्या वेळी मतदान केंद्र मर्यादिचे आत उपस्थित असलेल्या मतदारांना मतपत्रिका देता येतील. अशांना केंद्रप्रमुख योग्य ती चिठ्ठी देतील व त्यांना मतदानाची परवानगी देण्यात येईल.

**क)** प्रत्येक मतपत्रिकेवर, ती मतदारास देण्यापूर्वी त्यावर योग्य ते सील/केंद्रप्रमुख/केंद्राधिकारी यांची स्वाक्षरी आहे याची खात्री करणेत येईल.

**ड)** मतपत्रिका मतदारास देणेचे वेळी मतदारांची मतपत्रिकेसाठी ठेवलेल्या स्थळप्रतीवर स्वाक्षरी घेणेत येईल व मतदाराचे डाव्या हाताच्या अंगठया जवळील बोटावर विशिष्ट त-हेची शाई लावली जाईल.

**इ)** केंद्रातील कोणाही व्यक्तीने विविक्षित मतदारास दिलेल्या मतदान पत्रिकेचे अनुक्रमांक लिहून घेता कामा नयेत.

**फ)** मतदान केंद्रावर मतदानासाठी दिलेल्या मतपत्रिकांची एकूण संख्या व सुरवातीचा अनुक्रमांक, व शेवटचा अनुक्रमांक, मतपत्रिकांवरील उमेदवारानी अगर त्यांचे प्रतिनिधीनी मागणी केल्यास घेता येईल.

**(१६) मतदानाची कार्यपध्दती**

**अ)** मतदान केंद्रावर मतदारास केंद्रीय निवडणूक आयोग भारत सरकार यांनी दिलेले ओळखपत्र, पॅनकार्ड, ड्रायव्हिंग लायसेन्स, फोटोसह बँकपासबुक, ज्येष्ठ नागरिक ओळखपत्र यापैकी कोणत्याही एकाच्या आधारे स्वतःची ओळख पटवून देणे आवश्यक राहील.

**ब)** मतपत्रिका मिळताच मतपत्रिकेची खात्री करुन मतदार मतदान कक्षाकडे जाईल.

**क)** तेथे ज्या उमेदवारास मत देणेची इच्छा असेल, त्याच्या मतपत्रिकेवरील मतनोंदविणेचे जागेवर त्याला उपाययोजनांसाठी पुरविण्यात आलेल्या साधनाने शिक्का मारेल. एका मतदारास निवडून यावयाच्या जितक्या जागा जाहीर झाल्या असतील तितक्याच उमेदवारांच्या पुढे प्रत्येकी एक शिक्का मारता येईल. त्यापेक्षा कमी उमेदवारांच्या नांवापुढे शिक्का असलेली मतपत्रिका ग्राहय मानली जाईल. मात्र निश्चित झालेल्या जागांपेक्षा अधिक शिक्का असलेली मतपत्रिका रद्द मानली जाईल.

**ड)** आपले मत गुप्त मतदान पध्दतीने दिले असलेबाबत मतदाराने दक्षता घेतली पाहिजे.

**इ)** नोंदविलेले मत दिसू नये यासाठी मतपत्रिकेची त्वरित घडी केली जाईल.

**फ)** अशी योग्यरित्या घडी केलेली मतपत्रिका मतदार मतदानासाठी ठेवलेल्या मतपेटीत टाकील आणि मतदार केंद्राबाहेर जाईल.

**ग)** मतदान गुप्त पध्दतीने असल्याने, मतदाराने त्यासाठी अन्य कोणत्याही पध्दतीचे अगर खुणेचे कागद, किंवा अन्य गोष्टी बरोबर नेणेच्या नाहीत.

**ह)** मतदान स्थळी एक मतदार असताना दुस-या कोणत्याही मतदारास आत प्रवेश करण्यास परवानगी मिळणार नाही.

**ज)** आपली मतपत्रिका, मतपत्रिका म्हणून सोईस्करपणे उपयोगात येणार नाही इतकी एखाद्या मतदाराने अनावधाने खराब केली असेल तर, ती मतदान केंद्रप्रमुखाकडे त्याला परत

करता येईल आणि हया गोष्टींची पूर्ण खात्री झाली असेल तर, त्या मतदारास दुसरी मतपत्रिका देण्यात येईल आणि परत केलेल्या मतपत्रिकेवर '' खराब झालेली - रद्द केलेली '' असा मजकूर केंद्रप्रमुख स्वतःचे सहीने नोंद करतील व ती मतपत्रिका मतपेटीत टाकली जाणार नाही याची दक्षता घेऊन स्वतंत्र लखोटयात ती ठेवतील.

**स)** आपण अमुक एक मतदार आहोत असे सांगून एखादी व्यक्ती मतदान करुन गेल्यावर, जर दुसरी एखादी व्यक्ती ' आपण तो विशिष्ट मतदार आहोत ' असे सांगून मतपत्रिकेची मागणी करील तर, त्या व्यक्तीस स्वतःची ओळख पटवून देण्यासंबंधी केंद्रप्रमुख विचारणा करतील. केंद्रप्रमुखाची खात्री झाल्यास त्या मतदारास इतर कोणत्याही मतदाराप्रमाणे मतपत्रिका देण्यात येईल व त्यावर मत नोंदविता येईल. मात्र अशी देण्यात येणारी मतपत्रिका ही त्या केंद्रावर मिळालेल्या, प्राप्त झालेल्या मतपत्रिकातील शेवटची असेल. ती मतपत्रिका मतदान पेटीत न टाकता घडी करुन, एका पाकिटात घालून ते पाकिट केंद्रप्रमुख यांचेकडे दिले जाईल. मतपत्रिका देत असताना त्यावर दुबार नोंदलेली मतपत्रिका असे लिहून स्वतः केंद्रप्रमुख त्या मतपत्रिकेवर स्वाक्षरी करतील.

**(१७) मतदान बंद करणे**

**अ)** निश्चित करणेत आलेल्या वेळी मतदान केंद्रप्रमुख/केंद्राधिकारी मतदान बंद करतील आणि त्यानंतर कोणाही मतदारास मतदान केंद्रात प्रवेश देणार नाहीत. मात्र मतदान बंद होण्यापूर्वी केंद्रमर्यादेच्या आतील सर्व मतदारांना मतदान करुन देण्यात येईल.

**ब)** मतदान केंद्र बंद होण्यापूर्वी एखादा मतदार तेथे हजर होता किंवा नाही याबाबत प्रश्न निर्माण झाल्यास, त्याबाबत मतदान केंद्रप्रमुखांचा निर्णय हा अंतिम असेल.

**(१८) मतपेटया मोहोरबंद करणे**

**अ)** मतदान बंद झालेनंतर शक्य तितक्या लवकर केंद्रप्रमुख/केंद्राधिकारी तेथे हजर असणा-या उमेदवाराचे अगर प्रतिनिधीचे उपस्थितीत मतपेटीची फट मोहोरबंद करील. आणि कोणत्याही उमेदवारास अगर प्रतिनिधींना त्यांची स्वतःची मोहोर लावण्यास परवानगी देतील. अगर उपयोग केलेल्या मोहोरेवर सही करतील. मात्र केंद्रप्रमुख, केंद्राधिकारी यांचेवर हे बंधन असणार नाही. उमेदवार अगर प्रतिनिधीच्या गैरहजेरीत अगर अनुपस्थितीत केंद्रप्रमुख स्वतःचे सहीने मतपेटी बंद करणेस मोहोर लावेल.

**ब)** अशी मोहोरबंद मतपेटी केंद्रप्रमुख निर्वाचन अधिकारी यांचेकडे तातडीने सुपूर्त करतील. निर्वाचन अधिकारी यांचेकडे बंद पेटी सोबतच खालील कागदपत्रांचे पाकिट देतील.

**अ)** न वापरलेल्या मतपत्रिकांचा सील असलेला लखोटा.
**ब)** उपयोगात आणलेली मतदार यादी असलेला सील लखोटा.
**क)** वापरात आणलेल्या मोहोरा (स्लीप रॅपर) व मतपत्रिकांचा हिशोब.
**ड)** केंद्रावरील दुबार नोंदविलेल्या मतपत्रिकांचे सील केलेले पाकिट.
**इ)** मतदान प्रतिनिधी नियुक्तीं पत्रांचे सील केलेले पाकिट.
**फ)** विशेष घडले असेल तर घेतलेला निर्णय नमूद असलेली कागदपत्रे.
**ग)** इतर कागदपत्रे - जी निर्वाचनअधिकारी यांनी निश्चित केली असतील ती.

**(१९) पोस्टव्दारे मतदानासाठीचे नियम**

**अ)** अधिकृत मतपत्रिकेवर निवडून यावयाच्या जितक्या जागा जाहीर झाल्या असतील तितक्याच उमेदवारांच्या पुढे प्रत्येकी एक फुली करता येईल. त्यापेक्षा कमी उमेदवारांच्या नांवापुढे फुल्या असलेली मतपत्रिका ग्राहय मानली जाईल. मात्र निश्चित झालेल्या जागांपेक्षा अधिक फुल्या असलेली मतपत्रिका रद्द मानली जाईल.

**ब)** मतपत्रिका संस्थेने पुरविलेल्या व संस्थेचे छापील चिन्ह असलेल्या छोटया पाकिटात घालून ते छोटे पाकिट बंद करुन ते पाकिट संस्थेने पुरविलेल्या मोठया पाकिटात घालून ते मोठे पाकिट बंद केले पाहिजे. त्या मोठया पाकिटावर मतदाराचा यादीतील क्रमांक, संपूर्ण नांव व पत्ता असेल. मतदाराने त्या पाकिटावर स्वाक्षरी केली पाहिजे.

**क)** वरील कलम १९) ब) मधील तरतुदीनुसार बाहेरच्या मोठया पाकिटावर मतदाराची स्वाक्षरी नसल्यास तो लखोटा आतील मतपत्रिकेसह बाद समजणेत येईल व असे लखोटे निर्वाचन अधिकारी बाद म्हणून बाजूला ठेवतील.

**ड)** मतपत्रिकेचा लखोटा रजिस्टर एडी पोस्टानेच पाठविला असला पाहिजे. असे संस्थेकडे रजिस्टर एडी ने प्राप्त झालेले लखोटे ठेवणेसाठी एक स्वतंत्र मतपेटी संस्थेच्या कार्यालयात ठेवली जाईल. त्यावर निर्वाचन अधिका-यांची सही व सील असेल. असे सील करतेवेळी उमेदवारांपैकी उपस्थित असलेल्या उमेदवारांनाही त्यांच्या इच्छेनुसार निर्वाचन अधिका-यांच्या बरोबर आपली सही करता येईल.

**इ)** मतपत्रिका पाठविलेल्या दिवसापासून मतपेटी मतपत्रिका कार्यालयाकडे पोहोचणेच्या अखेरच्या दिनांकापर्यंत म्हणजेच प्रत्यक्ष मतदान संपण्याच्या वेळेपर्यंत निर्वाचन अधिका-यांच्या कार्यालयात ठेवली जाईल.

**फ)** मतपेटीस निर्वाचन अधिकारी यांचे रोज मतपेटी बंद करतेवेळी सील राहील. मत पेटी ठेवले तारखेपासून ते मतदान करणेच्या अखेरच्या तारखेच्या दिवशी वेळ संपेपर्यंत उमेदवारास अगर त्याच्या अधिकृत प्रतिनिधीस कार्यालयाचे वेळेत कार्यालयात उपस्थित राहणेचा अधिकार राहील.

**(२०) मतमोजणी (गुप्त व पोस्टाने मतदानासाठी)**

**अ)** निर्वाचन अधिका-यांच्या पर्यवेक्षणानुसार किंवा पर्यवेक्षणाखाली आणि त्यांच्या निर्देशाप्रमाणे मतमोजणी केली जाईल.

**ब)** मतमोजणीचे वेळी उमेदवार, निवडणूक प्रतिनिधी व मतमोजणी प्रतिनिधी यांना उपस्थित रहाता येईल. मतमोजणी प्रतिनिधीचे बाबत उमेदवारांनी पूर्वनियुक्ती करणेची आहे. मात्र उमेदवार अथवा प्रतिनिधी गैरहजर असले तरीही ठरलेल्या वेळी मतमोजणीचे काम सुरु केले जाईल.

**क)** मतमोजणी ही ठरलेल्या ठिकाणी, दिनांकास, वेळी केली जाईल.

**ड)** मतमोजणीसाठी मोहोरबंद मतदानपेटीची खात्री होण्याचे दृष्टीने अधिकृत उपस्थितांना ती दाखविणेत येईल. कांही आक्षेपार्ह असलेस, त्याचवेळी निर्वाचन अधिकारी यांचे निदर्शनास ते आणून दिले जाईल.

**इ)** मोहोरबंद मतदान पेटीची खात्री झालेवर, ती उघडल्यानंतर त्यामधील मतपत्रिका बाहेर काढून मोजणीसाठी तयार ठेवल्या जातील व त्यांचे जरुरीनुसार अगर आदेश वा सूचना असतील तर, त्या संख्येनुसार गठ्ठे तयार केले जातील. त्या पेटीतील अगर गठ्ठयातील मतपत्रिकांच्या मतमोजणीच्या दृष्टीने छानन्नी व मोजणी केली जाईल. त्यावेळी खालील

गोष्टी विचारात घेऊनच मतपत्रिका वैध किंवा अवैध ठरविण्यात येईल. मात्र याबाबत उमेदवार वा प्रतिनिधी यांना वाजवी संधी दिली जाईल. उमेदवार अगर प्रतिनिधी यांनी मतपत्रिकेला हात लावणेचा नाही.

(२१) **अवैध मतपत्रिका पोस्टामार्फत व गुप्त मतदानासाठी**

**अ)** मतपत्रिकेवर मतदार ओळखणे शक्य होईल अशा प्रकारची कोणतीही खूण किंवा कोणतेही लिखाण असेल, तर.

**ब)** मतपत्रिकेवर मत नोंदवलेले नसेल तर. (कोरी मतपत्रिका)

**क)** जेवढे उमेदवार निवडावयाचे असतील त्यापेक्षा अधिक मते दिलेली असतील तर.

**ड)** मतपत्रिका अधिकृत नसेल तर.

**इ)** ती मतपत्रिका खरीखुरी मतपत्रिका म्हणून ओळखता येणार नाही इतकी खराब झालेली असेल किंवा छिनविछिन्न झाली असेल तर.

**फ)** मतपत्रिकेवर असावयास हवी अशी खूण तीवर नसेल तर.

**ग)** केंद्रावर वापरण्यासाठी अधिकृत केलेल्या मतपत्रिकांचे अनुक्रमांकापेक्षा भिन्न असेल तर.

**ह)** पोस्टाने पाठविलेल्या बाहेरच्या मोठया पाकिटावर मतदाराची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. पाकिटावरील मतदाराची स्वाक्षरी ही त्याने संस्थेकडे भरुन दिलेल्या माहितीपत्रकातील स्वाक्षरीशी जुळती आहे किंवा नाही याची तपासणी केली जाईल. त्यात फरक असेल तर तो लखोटा आतील मतपत्रिकेसह बाद समजणेत येईल व असे लखोटे निर्वाचन अधिकारी बाद म्हणून बाजूला ठेवतील.

(२२) आणीबाणी अगर मतदान होऊ शकत नाही अशी परिस्थिती निर्माण झालेस :-

कोणत्याही मतदान केंद्रावरील कामकाजात कोणत्याही दंग्यामुळे किंवा उघड हिंसक कृत्यामुळे व्यत्यय किंवा अडथळा आला असेल, किंवा कोणत्याही नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा दुस-या कोणत्याही पुरेशा कारणामुळे, कोणत्याही मतदान केंद्रात मतदान घेणे शक्य नसेल तर, अशा मतदान केंद्राचा केंद्रप्रमुख निर्वाचन अधिका-यांच्या सम्मतीने नंतर नेमावयाच्या तारखेपर्यंत मतदान स्थगित केले आहे असे जाहीर करील. अशा परिस्थितीत त्या केंद्रावर तो पर्यंत झालेले मतदान रद्द समजणेत येईल.

(२३) **मतदानापूर्वी उमेदवार मरण पावणे :-**

जर निवडणूक लढवणारा उमेदवार मरण पावेल आणि त्याच्या मृत्यूचे प्रतिवेदन मतदानास प्रारंभ होण्यापूर्वी, निर्वाचन अधिका-यास प्राप्त होईल तर, निर्वाचन अधिकारी उमेदवाराच्या मृत्यूच्या वस्तुस्थितीबाबत खात्री झाल्यानंतर ती जागा वगळून उर्वरित जागांसाठीची निवडणूक प्रक्रिया पूर्ण करेल आणि नंतर शिल्लक राहिलेल्या जागेसाठी निवडणुकीचा नवीन कार्यक्रम निश्चित करेल.

(२४) उपरोक्तच्या निवडणूक नियमांच्या संदर्भात खालील प्रमाणे अ,ब,क,ड, इ (घटना पात्र/अपात्र उमेदवार नियम) व फ अशी पाच परिशिष्टे राहतील.

(२५) निकाल जाहीर झाल्या तारखेपासून पुढे एक वर्षापर्यंत गुप्त मतदान झालेल्या मतपत्रिका, टपालाव्दारे मतदान झालेल्या मतपत्रिका ज्या लखोटयातून आल्या ते छोटे व मोठे लखोटे सील करुन ठेवले जातील.

ॐ तेजस्विनावधीतमस्तु

सांगली शिक्षण संस्था, सांगली अ वर्गीय सदस्यांचे निवडणुकी बाबतचे नियम. परिशिष्ट अ

सांगली शिक्षण संस्थेच्या संचालक मंडळावरील अ वर्गीय नऊ सदस्यांची निवडणूक दिनांक................ इ............. रोजी होणेची तिजबाबतचा

उमेदवारी अर्ज

| अ.नं. | विषय | तपशील |
|---|---|---|
| १ | मतदारांच्या यादीतील उमेदवाराचे संपूर्ण नांव | |
| २ | उमेदवाराचे मतदार यादीतील रहाण्याचे गांव | |
| ३ | उमेदवाराचा मतदार यादीतील क्रमांक | |
| ४ | उमेदवाराचा मतदार यादीतील संपूर्ण पत्ता | |
| ५ | सूचकाचे मतदार यादीतील संपूर्ण नांव | |
| ६ | सूचकाचा मतदार यादीतील क्रमांक | |
| ७ | सूचकाची स्वाक्षरी व दिनांक | |
| ८ | अनुमोदकाचे मतदार यादीतील संपूर्ण नांव | |
| ९ | अनुमोदकाचा मतदार यादीतील क्रमांक | |
| १० | अनुमोदकाची स्वाक्षरी व दिनांक | |
| ११ | उमेदवाराची स्वाक्षरी व दिनांक | |
| १२ | संस्थेच्या सदस्य झाल्याची तारीख (१७.९.२०११ नंतर असल्यास नमूद करावी) | |

सूचना

१. मतदारांच्या यादीत उमेदवाराचे, सूचकाचे, अनुमोदकाचे संपूर्ण नांव असे नसल्यास यादीत जसे नांव असेल तसे या उमेदवारीच्या अर्जात प्रथम लिहावे आणि मग त्याखाली संपूर्ण नांव नमूद करावे.

२. हा उमेदवारीचा अर्ज संबंधितांनी पूर्णपणे व बिनचूक भरणेचा आहे.

३. हा उमेदवारीचा अर्ज कार्यालयाकडे दिनांक .................... रोजी सायंकाळी ५.०० अखेर पर्यंत अगर तत्पूर्वी मिळणेचा आहे

४. या अर्जाच्या झेरॉक्स प्रतीवर उमेदवारास अर्जाची पोहोच मिळेल.

५. १७.९.२०११ नंतर सदस्यत्व मिळाले असेल तर सदस्यत्व सुरु झालेची तारीख ..........................

---

(कार्यालयीन उपयोगासाठी)

पावती

श्री.................................. यांचेकडून सांगली शिक्षण संस्थेच्या अ वर्गीय सदस्यांच्या दिनांक .....................रोजी व्हावयाच्या निवडणूकीची अनामत रक्कम रुपये २५००/- (रुपये दोन हजार पाचशे मात्र) रोखीने/.............................. या बँकेवरील डी.डी.नंबर ................. दिनांक ..................... ने मिळाली.

सांगली, दिनांक                    सील                    रक्कम स्वीकारणा-याची सही.

ॐ तेजस्विनावधीतमस्तु
सांगली शिक्षण संस्था, सांगली
अ वर्गीय सदस्यांचे निवडणुकी बाबतचे नियम परिशिष्ट ब

प्रति, दिनांक
निर्वाचन अधिकारी
संचालक मंडळ अ वर्गीय सदस्य निवडणूक
सांगली शिक्षण संस्था, सांगली. यांसी

सांगली शिक्षण संस्थेच्या संचालक मंडळावरील अ वर्गीय सदस्यांची जी निवडणूक दिनांक ............ रोजी व्हावयाची आहे त्या निवडणुकीसाठी मी ................................ उमेदवारी अर्ज भरला आहे. तेंव्हा अर्जाची छाननी / मतदान / मतमोजणीचे वेळी माझ्या तर्फे श्री.................... (मतदार यादीतील क्रमांक) यांना संस्थेच्या कार्यालयात उपस्थित रहाण्यास आपली परवानगी असावी अशी विनंती आहे.

कळावे,

मतदान प्रतिनिधीची सही उमेदवाराची सही

ॐ तेजस्विनावधीतमस्तु
सांगली शिक्षण संस्था, सांगली
अ वर्गीय सदस्यांचे निवडणुकी बाबतचे नियम. परिशिष्ट क गुप्त मतदानासाठी मतपत्रिका नमुना

स्थळ प्रत सांगली शिक्षण संस्था, सांगली व्दारा सिटी हायस्कूल, गांवभाग, सांगली ४१६ ४१६
केंद्र क्रमांक......... व केंद्राचे नांव

संस्थेच्या संचालक मंडळावरील अ वर्गीय सदस्यांची निवडणूक दिनांक

मतपत्रिका अनुक्रमांक                                        सभासदाचा मतदार यादीतील क्रमांक

केंद्रप्रमुखाची स्वाक्षरी          केंद्राधिकारी स्वाक्षरी          **सील**          मतदाराची स्वाक्षरी

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मतपत्रिका अनुक्रमांक

सांगली शिक्षण संस्थेच्या संचालक मंडळावरील अ वर्गीय सदस्यांची दिनांक .................. रोजी जी निवडणूक व्हावयाची तिज बाबतची मतपत्रिका.

| अ.नं. | उमेदवाराचे नांव | गांव | मताचा शिक्का |
|---|---|---|---|
| सांगली - मिरज - कुपवाड शहर महानगर पालिका क्षेत्रातील | | | |
| १ | | | |
| २ | | | |
| सांगली - मिरज - कुपवाड शहर महानगर पालिका क्षेत्रा बाहेरील | | | |
| १ | | | |
| २ | | | |

सूचना :- १) सांगली - मिरज - कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील सहा उमेदवार व सांगली - मिरज - कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रा बाहेरील तीन उमेदवार अशा एकूण नऊ उमेदवारांची निवड व्हावयाची आहे. २) निवडून द्यावयाच्या संख्ये इतक्याच म्हणजेच एकूण नऊ नांवा समोर शिक्का उठविणेचा आहे. ३) मतपत्रिकेच्या कोणत्याही भागावर मतदाराने आपली स्वाक्षरी करणेची नाही. अगर अन्य कांहीही लिहिणेचे नाही वा खूण करणेची नाही.

ॐ तेजस्विनावधीतमस्तु
सांगली शिक्षण संस्था, सांगली
अ वर्गीय सदस्यांचे निवडणुकी बाबतचे नियम. परिशिष्ट ड पोस्टामार्फत मतदान मतपत्रिका नमुना

सांगली शिक्षण संस्थेच्या संचालक मंडळावरील अ वर्गीय सदस्यांची दिनांक .................. रोजी जी निवडणूक व्हावयाची तिज बाबतची मतपत्रिका.

| अ.नं. | उमेदवाराचे नांव | गांव | मताची फुली |
|---|---|---|---|
| सांगली - मिरज - कुपवाड शहर महानगर पालिका क्षेत्रातील | | | |
| १ | | | |
| २ | | | |
| सांगली - मिरज - कुपवाड शहर महानगर पालिका क्षेत्रा बाहेरील | | | |
| १ | | | |
| २ | | | |

सूचना
१) सांगली - मिरज - कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील सहा उमेदवार व सांगली - मिरज - कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रा बाहेरील तीन उमेदवार अशा एकूण नऊ उमेदवारांची निवड व्हावयाची आहे. २) निवडून द्यावयाच्या संख्ये इतक्याच म्हणजेच एकूण नऊ नांवासमोर फुली करणेची आहे. ३) मतपत्रिकेच्या कोणत्याही भागावर मतदाराने आपली स्वाक्षरी करणेची नाही. अगर अन्य कांहीही लिहिणेचे नाही वा खूण करणेची नाही. ४) मताच्या फुल्या करुन झाल्यावर मतपत्रिकेस प्रथम एक उभी घडी घालून नंतर आडव्या दोन घडया घालाव्यात. ५) संस्थेच्या कार्यालयाकडे मतपत्रिका परत करणेसाठी सोबत दोन पाकिटे आहेत. एक संस्थेचा पत्ता असलेले पाकिट व दुसरे एक संस्थेचे चिन्ह असलेले पाकिट. चिन्ह असलेल्या पाकिटात योग्य प्रकारे मते नोंदविलेली मतपत्रिका घालून ते पाकिट बंद करावयाचे आहे. ( या बंद पाकिटावर कांहीही लिहिणेचे नाही.) हे बंद पाकिट संस्थेचा छापील पत्ता असलेल्या पाकिटात घालून ते पाकिट बंद करावयाचे आहे. या बंद केलेल्या पाकिटाच्या मागील बाजूस मतदारांनी आपली स्वाक्षरी करणेची आहे. ६) मतपत्रिकेचे पाकिट रजिस्टर एडी पोस्टानेच पाठविणेचे आहे. ७) मतपत्रिकेचे बंद पाकिट संस्थेच्या कार्यालयाकडे रजिस्टर एडी पोस्टामार्फत पोहोचणेची अखेरची वेळ दिनांक ................ रोजी सायंकाळी ५.०० राहील. ८) वरील मुदतीनंतर येणारी मतपत्रिकेची पाकिटे अवैध समजली जातील.

ॐ तेजस्विनावधीतमस्तु
सांगली शिक्षण संस्था, सांगली
अ वर्गीय सदस्यांचे निवडणुकी बाबतचे नियम.
परिशिष्ट इ (घटना पात्र/अपात्र उमेदवार नियम)

(१) कायद्याने सज्ञान असलेल्या व्यक्तीलाच मताधिकार राहील.

(२) पेढया, हिंदू एकत्र कुटुंबे, संस्था व संघटित घटक यांचे संस्थेने मान्यता दिलेले प्रतिनिधी मतदानास पात्र राहतील. मात्र अशा प्रतिनिधीस संचालक मंडळाच्या निवडणूकीस उमेदवार म्हणून उभे रहाता येणार नाही. दिनांक ३०.७.२०२१ नंतर संस्थेचे सभासद झालेल्या पेढया, हिंदू एकत्र कुटुंबे, संस्था व संघटित घटक यांना व त्यांचे प्रतिनिधीस मतदानाचा अधिकार रहाणार नाही.

(३) सदस्य झाल्याच्या दिनांकापासून दोन वर्षे पूर्ण झाल्या शिवाय त्यांना संचालक मंडळाच्या 'अ' वर्गीय सदस्यांच्या निवडणूकीस उभे रहाता येणार नाही. संस्थेच्या सेवेतून निवृत्त झालेल्या सदस्यांना ते निवृत्त झाल्याच्या तारखेनंतर सहा वर्षे ' अ ' वर्गीय सदस्यांच्या निवडणूकीस उभे रहाता येणार नाही. संस्थेच्या सेवेत असणा-या सदस्यांना अ वर्गीय संचालक मंडळाच्या निवडणूकीस उभे रहाता येणार नाही.

ॐ तेजस्विनावधीतमस्तु
सांगली शिक्षण संस्था, सांगली
अ वर्गीय सदस्यांचे निवडणुकी बाबतचे नियम.
परिशिष्ट फ पोस्टा मार्फत मतदान करणेसाठी विनंती अर्जाचा नमुना.

रजिस्टर एडी.

दिनांक
सभासदाचे पूर्ण नांव
सभासदाचा क्रमांक
पत्रव्यवहाराचा पूर्ण पत्ता

प्रति,
निर्वाचन अधिकारी,
संचालक मंडळ अ वर्गीय सदस्य निवडणूक,
सांगली शिक्षण संस्था, सांगली.

सांगली शिक्षण संस्थेच्या संचालक मंडळावरील अ वर्गीय सदस्यांची दिनांक .................. रोजी ............ निवडणूक व्हावयाची आहे. आपण स्थापित केलेल्या मतदान केंद्र क्रमांक ................ वर माझे मतदान आहे. मी सदर मतदान केंद्रापासून पन्नास किलोमीटर बाहेरील रहिवासी आहे. तसेच प्रत्यक्ष मतदान केंद्रावर येऊन मतदान करणे मला ................................... या कारणास्तव शक्य होणार नाही. तरी मला पोस्टाव्दाने मतदान करणेची व्यवस्था उपलब्ध करुन द्यावी अशी विनंती आहे. केंद्रीय निवडणूक आयोग भारत सरकार यांनी दिलेले ओळखत्र/पॅनकार्ड/ड्रायव्हिंग लायसेन्स/ज्येष्ठ नागरिक ओळखपत्र (लागू नसेल ते खोडावे) ची सत्यप्रत सोबत जोडली आहे. तरी माझ्या विनंतीचा विचार व्हावा अशी विनंती आहे.

कळावे,

(सभासदाची सही)